Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# सावित्रीबाई फुले यांचे कार्य

**प्रा. डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे,** कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील कला महाविद्यालय, मारवड, ता. अमळनेर, जि. जळगाव

**गोषवारा**

महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य श्रेष्ठ आहे. भारतात यांचे स्थान अद्वितीय आहे. म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक सुधारणा करण्यासाठी कष्ट घेतले प्रतिकूल परिस्थितीतही कार्य केले. यांच्या कार्यातून आदर्श व प्रेरणा खूप मिळते.

म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना जुनी बंधने, जुन्या प्रथा-परंपरा, समजुती तोडण्यासाठी मारेठा लढा द्यावा लागला आहे. म. फुले व सावित्रीबाई यांचे कार्य समाजाला चालना देणारे होते. सामाजिक कार्य करत असताना त्यांना अतोनात त्रास सहन करावा लागला. म. फुले व सावित्रीबाई यांचे जीवन म्हणजे क्रांतीची धगधगती मशाल होय.

सावित्रीबाई फुले यांनी अपार कष्ट सहन करुन समाजाला सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक गुलामगिरीतून सोडविण्याचा प्रयत्न केला. समाजात समाजवादी, मानवतावादी दृष्टीकोन रुजविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शुद्र जाती, स्त्रीया ज्या अज्ञानी आहेत ते गुलामगिरीत जगणारे आहे. यांचे दु:ख नाहिसे करण्यासाठी सावित्रीबाई फुले यांनी आयुष्यभर संघर्ष केला.

**प्रस्तावना**

सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव या गावी 3 जानेवारी 1831 साली झाला. त्यांच्या वडीलांचे नाव खंडोजी नेवासे पाटील व आईचे नाव लक्ष्मीबाई होते.

खंडोजी नेवासे पाटील यांच्याकडे इनामदारी आणि गावाची पाटीलकी ही पदे होती. जात पंचायत बोलावणे, जातीचे व गावाचे भांडण-तंटे सोडवणे, लोकांच्या अडचणी सोडवणे, अन्नदान करणे, अपराध्यांना शिक्षा करणे इत्यादी कामे खंडोजी नेवासे पाटील करीत असत. यातून सावित्रीबाई यांना अनुभव मिळाले. त्यामुळे सावित्रीबाईंमध्ये जनतेविषयी काळजी, न्यायदान, नि:पक्षपातीपणा, धाडसीपणा, परोपकाराची भावना इत्यादी गुण वाढत गेले.

इ. स. 1840 मध्ये म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांचा विवाह झाला. म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई दोघेही शेतात कामाला जात, दुपारच्या वेळी जेवन झाल्यावर त्यांना काहीवेळ उसंत मिळाली की, त्या वेळेत झाडाखाली जमिनीवर काडीने रेघोट्या मारुन म. ज्योतिबा फुले सावित्रीबाई यांना लिहायला वाचायला शिकवीत असत. त्यामुळे सावित्रीबाई फुले या लिहायला आणि वाचायला शिकल्या.

त्यानंतर पुण्यातील नॉर्मल स्कूलमध्ये 1946 ते 47 या वर्षात सावित्रीबाईंनी शिक्षण पूर्ण केले. त्यांनतर अहमदनगर येथे मिसेस फेरॉर बाईच्या शाळेत अध्यापक प्रशिक्षणासाठी सावित्रीबाईंना म. ज्योतिबा फुले यांनी पाठविले. अशाप्रकारे सावित्रीबाईंनी प्रशिक्षण पूर्ण केले. त्यामुळे सावित्रीबाई ह्या आद्य भारतीय शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत. त्यांना शिकविण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पहिले पाऊल हेच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होय.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**सुचक शब्द:** इनामदारी, अद्वितीय, उसंत, रेघोट्या

**संशोधनाचा उद्देश**

1. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचे अध्ययन करणे.
2. सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक समाजाची जबाबदारी कशी सांभाळली यांचे अध्ययन करणे.
3. सावित्रीबाई फुले यांचे प्लेगच्या काळात केलेल्या कार्याचे अध्ययन करणे.

**गृहितकृत्य**

1. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्यामुळे त्याकाळात मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली झाली.
2. सावित्रीबाई फुले यांनी महिला सेवा मंडळ संस्थेची स्थापना केली.
3. सावित्रीबाई फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.
4. सावित्रीबाई फुले यांनी दुष्काळात गरीब लोकांना मदत केली.

**संशोधन पध्दती**

तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम स्त्रोताचा उपयोग केलेला आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके, इंटरनेटवरील महिती, वर्तमानपत्र, मासिके यासारख्या साधनाचा उपयोग केला आहे.

**संशोधनाचे महत्व**

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे अध्ययन करणे हा आहे. सावित्रीबाई फुले यांच्या काळात स्त्रीयांना व शुद्रांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नव्हता. त्यांच्यावर अनेक बंधने घातली गेली होती. त्यावेळी सावित्रीबाई फुले यांनी समाजात मानवतावाद निर्माण केला. स्त्रीयांसाठी शुद्र समाजासाठी अनेक कार्य केले. ही त्यांनी केलेली कार्ये महान आहेत. त्यांच्या या कार्याचा उपयोग समाजसुधारक, शासन, विद्यार्थी यांना होऊ शकेल, म्हणून हा विषय महत्वाचा आहे.

**सावित्रीबाई फुले यांचे कार्य**

**1) शैक्षणिक कार्य**

मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा चालू करणारे पहिले भारतीय म्हणजे म. फुले व सावित्रीबाई हे आहेत. सावित्रीबाई फुले या शैक्षणिक कार्य विनामुल्य करत असत. त्यांनी शिक्षणामध्ये शारीरिक शिक्षणाचा समावेश केला, बहुजनांसाठी देशातील 'नेटिव्ह लायब्ररी' काढली होती, विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणे, स्कॉलरशिप देणे सुरु केले होते, प्राथमिक स्तरापासून इंग्रजीचा पुरस्कार केला होता. प्रौढांसाठी प्रशिक्षण वर्ग सुरु केले. शेतकरी, कामगार यांच्यासाठी रात्रशाळा सुरु केल्या.

आधुनिक वैधानिक, मानवतावादी व धर्म निरपेक्ष शिक्षणाचा त्यांनी पुरस्कार केलेला होता. शिक्षणसाठी विद्यार्थ्यांना घरी विनामूल्य वस्तीगृह चालविते होते. तसेच विधवा स्त्रियांसाठीही वस्तीगृहाची सोय केलेली होती. 15 मे 1847 रोजी सावित्रीबाई व ज्योतिबा फुले यांनी महारवाड्यात अस्पृश्यांसाठी एक शाळा सुरु केली. तसेच संत चोखामेळा मंदिरातही महार-मांग, कुणबी अशा मुलांसाठी शाळा काढली होती. परंतु ही शाळा काही दिवसात बंद पडली.

म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांनी 1 जानेवारी 1848 रोजी पुण्यातील भिडेवाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. भारतीय व्यक्तींनी भारतात मुलींसाठी काढलेली ही पहिली शाळा होती. मुलींसाठी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

शाळा काढणे त्यावेळी अत्यंत कठीण कार्य होते. मुलींनी शिक्षण घेणे म्हणजे अधर्म मानले जात असे. मुली शिकल्या तर देवी देवतांचा कोप होतो अया गैरसमजही समाजात होता. त्यामुळे मुलींना शिक्षण दिले जात नसे. सावित्रीबाई फुले भिडेवाड्याच्या शाळेत शिकविण्यासाठी जाऊ लागल्या. समाजातील दुष्ट प्रवृत्तीचे लोक दगड मारणे, पान खाऊन अंगावर थुंकणे, टिंगल-टवाळी करणे, शिवीगाळ करणे असे करत असत. परंतु सावित्रीबाईंनी शाळेत कपडे ठेवले होते. त्या शाळेत गेल्यावर आंघोळ करुन चांगले कपडे घालीत असत. मग शिकवायला सुरुवात करत होत्या. म. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुणे परिसरात कमीत कमी 18 शाळा काढल्या होत्या. या सर्व शाळांचे संचालन सावित्रीबाई करत होत्या.

**2) जातीभेद, अस्पृश्यता**

19 व्या शतकाच्या सुरुवातीला जातीभेद, अंधश्रध्दा, कनिष्ठ जातीच्या लोकांचे शोषण सुरु होते. या काळात स्त्रीयांना व अस्पृश्य जोकांना अत्यंत वाईट वागणूक दिली जात होती. त्यानंतर ब्रिटीश भारतात आले तरी भारतातील जातीयता, भेदभाव, अंधश्रध्दा संपली नव्हती.

धर्मशास्त्रानुसार शुद्र जातीच्या लोकांना व स्त्रीयांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. यांना पशुपेक्षाही हलाखीचे जीवन जगावे लागत होते. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीच्या लोकांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरु दिले जात नसे. त्यांनी संपत्ती गोळा करु नये, नवीन कपडे, दागिने घालू नये, वेदमंत्र ऐकू नये, वरिष्ठ जातीच्या लोकांपासून अंतर ठेवून जीवन जगावे, शुद्र लोकांची सावलीसुध्दा पडता कामा नये असं बंधन लादले होते. अशी भयानक परिस्थिती चालू असतांना म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी कार्य केले. आपल्या कार्यातून मानवतावाद निर्माण केला. अस्पृशांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे काम म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केले. अस्पृश्य लोकांमध्ये जागृती घडून यावी म्हणून प्रयत्न केले. त्यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून उच्च जातीच्या लोकांवर कठोर टीका केली आहे.

**3) केशवपन प्रथेविरुध्द संघर्ष**

म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांच्या काळात एखादी स्त्री विधवा झाली तर ती विद्रुप दिसावी म्हणून केशवपन (टक्कल) केले जात असे. हे काम न्हावी करीत असत. अशावेळी गुलामीत जगणाऱ्या विधवा स्त्रीयांना सांगून काही फायदा नव्हता. धर्ममार्तंड लोक ऐकणार नव्हते. म्हणून म. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी न्हाव्याचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी एक परिषद बोलावली. त्यात विधवा स्त्रीयांची परिस्थिती व केशवपन प्रथा किती वाईट प्रथा आहे यावर चर्चा झाली. नाभिकांनी विधवांचे टक्कल करु नये असे ठरवले. न्हाव्यांना व्यक्तिगत भेटून त्यांचे मन परिवर्तन करण्याचे कार्य म. ज्योतिबा फुले यांनी केले. यामुळे पुण्यातील न्हाव्यांचे मनपरिर्वन होवून त्यांनी केशवपनाविरुध्द संप पुकारला आणि केशवपनावर बहिष्कार टाकला.

**4) विधवा पूर्नविवाह**

25 जुलै 1856 रोजी ब्रिटिशांनी विधवा विवाह कायदा अंमलात आणला. त्यामुळे विधवांना पुर्नविवाहाचा हक्क प्राप्त झाला. परंतु समाजामध्ये विधवा विवाह होत नव्हते. म. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी विधवा पूर्नविवाहासाठी समाज जागृती केली. त्यांच्या प्रयत्नाने पुण्याच्या गोखले बागेत शेणवी जातीत पहिला विधवा पुर्नविवाह 1864 मध्ये घडवून आणला होता.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

सीताराम जबाजी आल्हाट हे म. ज्योतिबा फुले यांच्या दुकानात काम करीत होते. ते विधूर होते. त्यांच्या पुर्नविवाह सावित्रीबाई यांनी त्यांची मैत्रीण बजुबाई ग्यानोबा निंबाळकर या विधवा स्त्रीसोबत 25 डिसेंबर 1873 रोजी सत्यशोधक पध्दतीने लावण्यात आला.

विधवा स्त्रीयांच्या समस्या सोडविण्यासाठी सावित्रीबाई यांनी पुर्नविवाह संस्था स्थापन केली होती. दर 15 दिवसांनी सभा घेतली जात असे आणि त्यात स्त्रीयांचे प्रश्न, शिक्षण, छळ या मुद्यांवर चर्चा होत असे.

**5) अस्पृश्यांसाठी पाणवठे खुले केले**

म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांच्या काळात पुण्यामध्ये अनेक ठिकाणी पाण्याचे हौद होते. परंतु तेथे अस्पृश्यांना स्वत: पाणवठ्यावर स्वत: पाणी भरण्याची परवानगी नव्हती. अस्पृश्यांनी आपले भांडे, पाणवठ्याच्या बाजूला अंतरावर नेऊन ठेवायच्या, कोणी त्यामध्ये पाणी टाकले तर त्यांना पाणी मिळायचे. यामुळे त्यांना तासनतास ताटकळत बसावे लागत असे. ही परिस्थिती म. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाईंनी पाहिली आणि आपल्या घराचा हौद व विहीर अस्पृश्यांसाठी खुली केली. त्यामुळे अस्पृश्यांची तेथे गर्दी झाली. त्यांना पाण्याचा अधिकार मिळालेला होता.

**6) 1876 च्या दुष्काळात गरीब लोकांना मदत कार्य**

महाराष्ट्रामध्ये 1876-77 मध्ये भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी गरीब लोक, जनावरे अन्न-पाणी न मिळाल्याने मरु लागले. त्यावेळी म. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी शासनाकडे गरीब लोकांना कामे मिळावीत यासाठी मागणी केली. त्यानंतर शासनाने तलाव, रस्ते बांधण्याच्या कामांना सुरुवात केली. त्यामुळे लोकांना मजुरी मिळाली आणि अनेक लोकांचे प्राण वाचले. म. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी दुष्काळ काळात मदतनिधी जमविण्याचे कार्य केले. याशिवाय दुष्काळग्रस्तांसाठी मदत म्हणून ज्वारीच्या चार गाड्याही पाठविल्या.

सावित्रीबाई यांनी धनकवाडी येथे मुलाबाळांना जगवण्यासाठी 'व्हिक्टोरिया बालकाश्रम'हे अन्नछत्र सुरु केले. सत्यशोधक समाजातर्फे अनेक ठिकाणी 52 अन्नछत्रे उघडली. या अन्नछत्रांचे नेतृत्व सावित्रीबाई करीत होत्या.

**7) 1896 च्या दुष्काळ काळात मदतकार्य**

1896 मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. समाजातील बऱ्याच लोकांना खायला अन्न मिळत नव्हते. त्यावेळी सत्यशोधक समाजाची बैठक घेतली सावित्रीबाईंच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ ब्रिटिश गव्हर्नरला भेटायला गेले. गावोगावी दुष्काळी कामे सुरु करण्याची मागणी या शिष्टमंडळाने ब्रिटिश गव्हर्नरकडे केली. ब्रिटिश सरकारने गावागावांत दुष्काळी कामे सुरु केला. अशाप्रकारे सावित्रीबाई फुले यांच्या प्रयत्नांमुळे दुष्काळ ग्रस्तांसाठी रोजगार हमी योजना सुरु झाली होती. त्यावेळी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेतीवरील करात सूट मिळावी. मोफत बी-बियाणे मिळावेत यासाठी सावित्रीबाईंनी प्रयत्न केले. 1876 च्या दुष्काळाप्रमाणे या दुष्काळात सावित्रीबाईंनी मुलांसाठी अन्नछत्रे उघडली होती.

**8) महिला सेवा मंडळ संस्थेची स्थापना**



Copyright © | JET Network, All Rights Reserved

सावित्रीबाई फुले यांनी 1852 मध्ये महिला सेवा मंडळ नावाची संस्था स्थापन केली होती. या मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती जोन्स व सचिव सावित्रीबाई फुले या होत्या. या मंडळाच्या नेहमी बैठका होत असत व त्यामध्ये स्त्रियांच्या समस्या व त्यांचे निवारण करण्यासाठी चर्चा होत असे. येथे सर्वजाती-धर्माच्या स्त्रीया येत असत. येथे हळदकुंकू व तिळगुळाचा कार्यक्रमही केला जात असे. कोणत्याही प्रकारचा जातीभेद व पक्षपात न करता सर्वांना हळदी कुंकू लावले जाई व तिळगुळ वाटण्यात येत असे.

या मंडळातर्फे या मंडळाच्या सदस्या असलेल्या महिलांकडून खादीची सूतकताई करुन त्याचे कापड तयार करुन घेतले जात असे. त्या वस्तूंची विक्री केली जात असे. या प्रकारे महिलांना काही उत्पन्नही मिळत असे. अशाप्रकारे महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मिळत असे.

**9) श्राध्द घालण्याऐवजी दानधर्म केला**

म. ज्योतिबा फुले यांचे वडील गोविंदराव यांचे निधन झाले. तेव्हा धर्मग्रंथात सांगितलेले अंत्यसंस्काराचे विधी केले नाहीत. चालीरीती सोडून अंत्यविधी पार पाडला. कावळयांना पिंड दिल्यामुळे ब्राह्मण भोजन घातल्यामुळे मृतात्म्यांना शांती मिळते यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्याऐवजी त्यांनी अपंग, अनाथ लोकांना जेवू घातले. गरीब विद्यार्थ्यांना पाटी-पेन्सिल, पुस्तके, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पैसे वाटले. रुढी-प्रथा, परंपराचे पालन करण्याऐवजी म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांनी गरीब लोकांना दानधर्म केला.

**10) बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना**

म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांच्या काळात विधवाची स्थिती अतिशय वाईट होती. एखादी स्त्री विधवा झाली तर समाजातील लोकांची वाईट नजर तिच्यावर राहत असे. यातून ती गर्भवती राहिली तर अनेक समस्यांचार सामोरे जावे जागत असे. अशा संकटग्रस्त महिलांसाठी गंजपेठेत स्वतंत्र वाडा बांधला. त्यामध्ये 28 जानेवारी 1863 मध्ये बालहत्या प्रतिबंधकगृह स्थापन करण्यात आले. हे गृह सावित्रीबाई चालवित असत. या गृहाच्या जाहिरातीसाठी एक स्वतंत्र पत्रक छापले होते व त्यावर लिहिले होते, "एखाद्या विधवेचे वाकडे पाऊल पडले आणि ती गरोदर राहिली तर या गृहात येऊन बाळाला जन्म द्यावा. हे मूल न्यावे किंवा येथे ठेवावे हा तुमचा प्रश्न आहे. त्या बाळाची काळजी हे अनाथाश्रम घेईल". या गृहामध्ये महिलांची काळजी घेणे, त्यांची बाळंतपणे करणे ही कामे स्वत: सावित्रीबाई करत होत्या. या त्यांच्या कार्याला समाजातून प्रचंड विरोध झाला.

**11) सत्यशोधक समाज जबाबदारीचे कार्य**

28 नोव्हेंबर 1890 रोजी म. ज्योतिबा फुले यांचे निधन झाले. त्यानंतर सत्यशोधक समाजाची जबाबदारी सावित्रीबाईंवर आली. 1893 मध्ये सत्यशोधक समाजाची परिषद पुण्याजवळ सासवड येथे भरली होती. त्याचे अध्यक्षपद सावित्रीबाईंनी भुषविले होते. त्यांच्या भाषणात त्यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, गरीबांवर होणाऱ्या अन्यायावर चर्चा केली होती. त्यानंतर खेडोपाडी जाऊन समाजात जनजागृती केली. त्यांनी हुंडाप्रथेला विरोध केला. विधवा पूर्नविवाह लावले. सत्यशोधक समाजातर्फे वेगवेगळया विषयावर कार्य सुरु होते. गरीब लोकांवर होणाऱ्या शोषणाविरुध्द, तर काही ठिकाणी सावकार व जमीनदार यांच्या विरुध्द लढे सुरु होते.

**12) प्लेगच्या काळात सावित्रीबाई फुले यांचे कार्य**



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

1897 मध्ये पुणे परिसरात प्लेगने थैमान घातले होते. काखेत गाठ येऊन तापाने फणफणून रोगी मरत होते. त्या साथीच्या काळात प्लेगशी झुंज देण्याचा निर्धार सावित्रीबाईंनी केला. रोग पसरु नये यासाठी काय उपाय व उपचार करावेत यासाठी प्रयत्न केले. त्याकाळात अस्पृश्यांच्या वस्त्यांमध्ये जाऊन प्लेगच्या रोग्याची माहिती घेत असत. प्लेगचा रोगी आढळल्यास त्यावर उपचार करण्यासाठी दवाखान्यात नेले जात असे. पुण्याजवळ घोरपडी येथील ज्ञानोबा ससाणे यांच्या माळरानावर झोपडीच घर उभारुन तेथे दवाखाना करण्यात आला सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते व सावित्रीबाई या रोग्याला घेऊन येत व त्या दवाखान्यात उपचार केले जात असे. डॉ. यशवंत हे सर्व उपचार विनावेतन करीत असत.

मुंढवे गावात प्लेगची लागण एका अस्पृश्य मुलाला झाली असल्याची खबर सावित्रीबाईंना मिळाली होती. त्याला दवाखान्यात नेण्यास कोणीच तयार नव्हते. सावित्रीबाई फुले यांनी जातीपातीची पर्वा न करता त्या मुलाला उचलून घोरपडीच्या दवाखान्यात आणले. परंतू त्यावेळी सावित्रीबाई फुले यांनाही प्लेगची लागण झाली आणि 10 मार्च 1897 रोजी त्यांनी देहत्याग केला. अखेरच्या क्षणापर्यंत सावित्रीबाई फुले या समाजसेवा करत होत्या.

**निष्कर्ष**

1. सावित्रीबाई फुले यांनी जुन्या प्रथा-परंपरा, समजुती तोडण्यासाठी मोठा लढा दिला.
2. सावित्रीबाई फुले यांनी समाजाला सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक गुलामगिरीतून सोडविण्याचे कार्य केले.
3. मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा चालू करणारे पहिले भारतीय म्हणजे म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई हे आहेत.
4. सावित्रीबाई फुले यांनी विधवा पूर्नविवाहासाठी समाजजागृती केली.
5. म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी अस्पृश्य समाजासाठी पाणवठे खुले केले.
6. म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांनी दुष्काळात गरीब लोकांना मदत केली.
7. सावित्रीबाई फुले यांनी महिला सेवा मंडळ संस्थेची स्थापना केली.
8. म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यानी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.
9. प्लेगया काळात सावित्रीबाई फुले यांनी कार्य केले.

**शिफारशी**

1. सावित्रीबाई फुले यांचे कार्य श्रेष्ठ आहे. त्यांच्या कार्यामुळे निश्चितच समाजसुधारणा होवू शकते.
2. सावित्रीबाई फुले यांनी प्रतीकुल परिस्थितीतही प्रचंड कार्य केले. त्यांच्या कार्यातून आदर्श व प्रेरणा मिळते.
3. सावित्रीबाई फुले यांनी जुन्या रुढी, प्रथा-परंपरा तोडण्यासाठी मोठा लढा दिला. समाजातील रुढी, परंपरा कमी झाल्या तरच समाजाचा विकास होईल.
4. समाजातील जातीभेद, अंधश्रध्दा, कनिष्ठ जातीच्या लोकांचे शोषण, स्त्रीयांना दिली जाणारी दुय्यम वागणूक कमी झाली पाहिजे.
5. समाजात मानवतावाद निर्माण झाला पाहिजे.
6. स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार या मुद्यांवर चर्चा झाली पाहिजे.
7. स्त्रीयांना शिक्षणाचे अधिकार जास्तीत जास्त कसे देता येतील यासाठी प्रयत्न होणे गरचेजे आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

8. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने योजना राबविणे आवश्यक आहे.
9. समाजातील विधवा स्त्रीयांना वाईट वागणूक मिळते. अशा स्त्रीयांविषयी समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

**सारांश**

सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत स्त्रीयांसाठी शुद्र जातीसाठी केलेली कार्ये महान आहे. त्या काळात स्त्रीयांना तसेच शुद्र जातीना माणूस म्हणून जगण्याचा हक्क नव्हता. त्याकाळात स्त्रियांसाठी, अस्पृश्यांसाठी शाळा सुरु करणे, अस्पृश्यांना आपला हौद खुला करणे, केशवपनाची प्रथा बंद करण्यासाठी न्हाव्यांचा संप घडवून आणणे, बालहत्या प्रतिबंधे गृह काढून विधवांना व त्यांच्या अपत्यांना आधार देणे, दुष्काळामध्ये अन्नछत्र चालविणे या सर्व कार्यात सावित्रीबाईंनी म. ज्योतीबा फुले यांना साथ दिली.

म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई यांना जातीबांधवांनी जातीबाह्य केले होते. त्यांच्यावर नातेवाईकांनीही बहिष्कार टाकलेला होता. त्यांना मानसिक, सामाजिक, आर्थिक कुठलाच आधार मिळत नव्हता. समजातील लोकही त्रास देत होते तरीही आपल्या कार्यापासून म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले कधीच डगमगले नाहीत. आपले कार्य त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत चालूच ठेवले.

**संदर्भग्रंथ**

1. कठारे अनिल, 'भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास', एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद, 2013
2. किर धनंजय, 'महात्मा ज्योतिबा फुले', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, 2000
3. मंगला कामत, 'महाराष्ट्रातील समाजसुधारक', ज्ञानदा प्रकाशन, पुणे 2001
4. भिडे जी. एल., पाटील एन. डी., 'महाराष्ट्रातील सुधारणेचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2012
5. ठोंबरे सतीश, 'महाराष्ट्रातील समाज सुधारक', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद 2010
6. स्वामी व्ही. एन., 'महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत', विद्याभारती प्रकाशन, लातूर, 2011
7. शहा घनशाम, 'भारतातील सामाजिक चळवळी', डायमंड प्रकाशन, पुणे 2004
8. फडके य. दि. (संपादक), 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1991.


Copyright © | JET Network, All Rights Reserved